**<u>अमरावती व पुणे विभाग शिक्षक तसेच नागपुर, औरंगाबाद व पुणे विभाग पदवीधर विधानपरिषद मतदार संघांच्या नव्याने तयार करण्यात येत असलेल्या मतदार याद्यांच्या संदर्भात महत्वाचा खुलासा.</u>**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार वर नमूद शिक्षक व पदवीधर विधान परिषद मतदार संघांच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम सुरु असून अंतिम मतदार याद्या दि.30.12.2025 रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. तथापि, विधानपरिषदेच्या सदर जागा डिसेंबर-2026 मध्ये रिक्त होणार आहेत. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, 1950 मधील तरतूदीनुसार मतदार याद्यांमध्ये संबंधित निवडणूकांकरीता नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत सुधारणा, नव्याने समावेशन किंवा वगळणी करता येते. सबब, उपरोक्त नमूद शिक्षक व पदवीधर विधानपरिषद मतदार संघाच्या मतदार याद्या दि.30.12.2025 रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या तरी तद्नंतरही त्या याद्यांमध्ये ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने नव्याने नाव समाविष्ट करण्याची संधी संबंधित निवडणूकांच्या नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत उपलब्ध असणार आहे.

*****************************